पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी,
पुणे – ४११ ०१७
जा.क्र.डक्षेका/कावि/४५/ २०१९
दिनांक– २९ / ०६ / २०१९

प्रति,
मा.श्री/श्रीमती ----------------------------
----------------------------------------
----------------------------------------

**विषय :- ड प्रभाग समितीची मासिक सभा कार्यपत्रिका क्र. ३ दिनांक ०५/०७ /२०१९ रोजी आयोजित केलेबाबत.**

**महोदय,**

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जुलै २०१९ ची मासिक सभा ड क्षेत्रिय कार्यालयाचे **"छत्रपती शाहू महाराज सभागृह"** येथे शुक्रवार दिनांक ०५/०७/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेली आहे.

सदर सभेमध्ये सोबत जोडलेल्या कार्यपत्रिकेप्रमाणे कामकाज करण्यात येईल. सदर सभेस आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

**सही/-**
**प्रशासन अधिकारी तथा**
**सचिव, सभाशाखा**
ड क्षेत्रीय कार्यालय,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे-१७

सोबत - कार्यपत्रिका क्र: ०३
दिनांक:- ०५/०७ /२०१९

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे-१७

## ड प्रभाग समिती,

## कार्यपत्रिका क्र. ०३

दिनांक :०५ /०७/२०१९ वेळ दुपारी १२. ०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ड प्रभाग समितीची माहे जुले २०१९ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०५/०७/२०१९ रोजी दुपारी १२.०० वा. रहाटणी येथील ड क्षेत्रीय कार्यालयाचे "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजित केलेली आहे. सभेमध्ये खालीलप्रमाणे कामकाज होईल.

१) मागील सभा कार्यपत्रिका क्र. २ माहे जून २०१९ चा सभावृत्तांत कायम करणे.

२) प्रभाग क्र.२५ मधील मौजे पुनावळे व परिसरामध्ये मोठया प्रमाणात लोकवस्तीत वाढ होत असून सद्यस्थितीत अस्तित्वातील रस्ते व भविष्यातील डी.पी.रस्ते वाहतुकीच्या दृष्टीने कमी पडू शकतात. त्यामुळे मौजे पुनावळे येथील वाहतूक समस्या दूर करणेकरीता पुनावळे येथील सर्व्हे नं.१२ व १३ मधून पांढरेवस्तीकडे जाणा-या १८.०० मी.रुंद डी.पी.व मुंबई-बैंगलोर महामार्गाकडून कोयतेवस्तीकडे जाणा-या ३०.०० मी.रुंद डी.पी.रस्त्याला जोडणेकरीता पुर्व-पश्चिम दिशेला १२.०० मी. रुंदीचा डी.पी.रस्ता कलम २०५ अंतर्गत घोषित करणेबाबतचा प्रस्ताव

३) मा.प्रभाग समिती विषय क्र.१ ठराव क्र.३९, दि. ०१/०२/२०१९ चे ठरावात दुरुस्तीबाबत. सदर ठरावामध्ये मौजे पुनावळे येथील जांबे हद्दीशेजारील नाल्याजवळ सर्व्हे नं.४१ व ४२ मधून जांबे हद्दीलगत असलेल्या नाल्यालगत ९.०० मी.रुंदीचा डी.पी.रस्ती महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम २०५ अन्वये घोषित करणेबाबतचा प्रस्ताव मान्य केला होता. तरी सदर ठिकाणी गरज पाहता सदर नाल्या शेजारुन जाणारा रस्ता हा ९.०० मी.रुंदी ऐवजी १२.०० मी. रुंदीचा रस्ता घोषित करणेबाबतचा प्रस्ताव.

४) पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग क्रमांक २५ पुनावळे मधील नव्याने विकसीत होत असलेल्या उद्यानासाठी आरक्षीत जागा ही वै.काशिनाथ कृष्णाजी ढवळे पाटील यांच्या मालकीची होती. वै.काशिनाथ कृष्णाजी ढवळे पाटील यांच्या वारसदारांच्या मागणीनुसार सदर उद्यानास वै.काशिनाथ कृष्णाजी ढवळे पाटील असे नामकरण घोषित करण्याबाबतचा प्रस्ताव

५) पिं. चिं म.न.पा. स्थापत्य विभागाकडून ड क्षेत्रीय कार्यालय परिसरात (प्रभाग क्र.२६ वाकड- पिंपळे निलख) मौजे वाकड सर्वे नं. २४३/१/१ दत्तमंदीर रोड, वाकडचौक सिग्नलकडे जाताना डाव्या बाजूला शेवटची जी कॉलनी आहे त्या कॉलनीच्या पुढे शेख वस्ती १ कडे जाताना जी कॉलनी आहे त्यास **"जय भवानी चौक"शेडगे वस्ती वाकड** हे नाव तेथील स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार घोषित करणेबाबतचा प्रस्ताव.

६) पिं. चिं म.न.पा. स्थापत्य विभागाकडून ड क्षेत्रीय कार्यालय परिसरात (प्रभाग क्र.२६ वाकड- पिंपळे निलख) मौजे वाकड सर्वे नं. २४२ दत्तमंदीर रोड, वाकडचौक सिग्नलकडे जाताना डाव्या बाजूला शेवटची जी कॉलनी आहे त्या कॉलनीस **"कै.गजराबाई भाऊसाहेब कलाटे नगर"** हे नाव तेथील स्थानिक नागरीकांच्या मागणीनुसार घोषीत करणेबाबतचा प्रस्ताव.

७) पिं. चिं म.न.पा. स्थापत्य विभागाकडून ड क्षेत्रीय कार्यालय परिसरात (प्रभाग क्र.२६ वाकड पिंपळे निलख) मौजे वाकड सर्वे नं. १८९/३ दत्तमंदीर रोड, चिरायु हॉस्पिटलला लागून जो रस्ता जातो त्या

कॉलनीला **"साईनाथ कॉलनी "** हे नांव तेथील स्थानिक नागरीकांच्या मागणीनुसार घोषीत करणेबाबतचा प्रस्ताव .

८) मा. सभापती ड प्रभाग समिती यांचे सुचनेनुसार करावयाचे कामकाज

**सही/-**

जा.क्र.:डक्षेका/कावि/ ४५ /२०१९

दि. २५ /०२/२०१९

प्रशासन अधिकारी तथा
सचिव, सभा शाखा,
ड क्षेत्रिय कार्यालय,
राहटणी, पुणे – १७